ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 34 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4

Total No. of Questions : 34 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 44-M (OS)**

**Code No. : 44-M (OS)**

**ಶಿಕ್ಷಣ – II**

**EDUCATION – II**

# ಶೈಕ್ಷಣಿಕ ನಿರ್ವಹಣೆ ಮತ್ತು ಶಾಲಾ ಸಂಘಟನೆ

# EDUCATIONAL MANAGEMENT AND SCHOOL ORGANISATION

(ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ)

( Marathi Version )

**( ಹಳೆ ಪಠ್ಯವಸ್ತು )**

**( Old Syllabus )**

ದಿನಾಂಕ : 30. 06. 2015 ]

Date : 30. 06. 2015 ]

ಸಮಯ : ಮಧ್ಯಾಹ್ನ 2.00 ರಿಂದ 5.00 ರವರೆಗೆ ] [ ಪರಮಾವಧಿ ಅಂಕಗಳು : 100

Time : 2.00 P.M. to 5.00 P.M. ] [ Max. Marks : 100

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate*

**भाग – अ**

I. खालीलपैकी कोणत्याही **चार** प्रश्नांची उत्तरे लिहा. त्याच प्रश्नाच्या (a) आणि (b) उप प्रश्नांची उत्तरे लिहीणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाला 10 गुण आहेत. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **तीन** पानापेक्षा जास्त असू नये. 4 × 10 = 40

1. a) शालेय व्यवस्थापनाची लोकशाही तत्वे म्हणजे काय ? कोणत्याही दोन तत्वांचे वर्णन करा.

   b) ''शाळेच्या सक्षम कार्यवाहीसाठी शाळा व्यवस्थापन आवश्यक आहे.'' या विधानाचे समर्थन करा. 6 + 4

2. a) ''प्राथमिक शिक्षणाच्या व्यवस्थापनासाठी BEO ची भूमिका आवश्यक आहे.'' का ?

   b) कर्नाटकातील प्राथमिक शिक्षणाची व्यवस्थापन पद्धत सांगा. 6 + 4

3. a) 'प्रार्थनेत एकता किंवा संभाषण ही अध्यात्मक शक्ती आहे.' या विधानाचे पृथ:करण करा.

   b) शाळेतील अध्यापन पद्धतीच्या व्यवस्थापनात विचारात घेतले जाणारे मुद्दे कोणते आहेत ? 6 + 4

4. a) उत्तम वर्ग खोलीची लक्षणे स्पष्ट करा.

   b) काळया फलकाचा उपयोग करताना लक्षात ठेवण्याच्या घटकांची यादी करा. 6 + 4

5. a) शाळेमध्ये कोणते दस्तावेज ठेवले पाहिजेत ? त्याचे अर्थपूर्ण वर्णन करा.

   b) प्राथमिक शाळा शिक्षकांच्या नेमणुकीत पारदर्शकता आणण्यासाठी सरकारने केलेल्या उपायांची चर्चा करा. 6 + 4

6. a) मुख्य शिक्षकाकडे हवी असलेली गुण लक्षणे कोणती ?

   b) शालेय व्यवस्थापनात मुख्याध्यापक हा आधार स्तंभा प्रमाणे ( संस्थापकीय ) असतो. या विधानाचे स्पष्टीकरण करा. 6 + 4

7. a) शिक्षकांचा कार्यभार ठरविणारे घटक कोणते ? त्यापैकी कोणत्याही दोन घटकांचे वर्णन करा.

   b) बक्षिस आणि शिक्षा या मुलाच्या अध्ययनामध्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत." कसे ? चर्चा करा. 6 + 4

## भाग - ब

II. खालीलपैकी कोणत्याही **सात** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येकी **पाच** गुण आहे. प्रत्येक प्रश्नांचे उत्तर **एका** पानापेक्षा जास्त असू नये : $7 \times 5 = 35$

8. शैक्षणिक व्यवस्थापनाच्या पद्धतीचे वर्णन करा.

9. शैक्षणिक व्यवस्थापनात मानवी संबंध आवश्यक आहेत. का ? स्पष्ट करा.

10. जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रमाची ( DPEP ) मुख्य उद्दिष्टांचे वर्णन करा.

11. केंद्र सरकारची भूमिका अतिशय महत्वाची आणि शैक्षणिक व्यवस्थापनात निर्णायक असते. स्पष्ट करा.

12. संस्थेची योजना म्हणजे काय ? संस्थेची योजना बनविण्याच्या पद्धतीचे संक्षिप्तपणे वर्णन करा.

13. प्राथमिक शाळेच्या चौरस आकाराच्या इमारतीचा आराखडा काढा. योजनेमध्ये खालील घटक स्पष्टपणे दाखवा :

    i) सभा हॉल

    ii) मुख्याध्यापकाची खोली

    iii) प्रयोगशाळा

    iv) शालेय बगीचा.

14. शाळेमध्ये दस्तावेज ( records ) ठेवणे अतिशय महत्वाचे आहे का ? चर्चा करा.

15. DDPI चे अधिकार आणि कर्तव्ये कोणती ? ( प्रशासकीय )

16. वेळापत्रकाचे प्रकार कोणकोणते ? प्रत्येकाचे वर्णन करा.

17. शिक्षकाने कोणते नियम आणि निर्बंध पाळले पाहिजेत ?

## भाग – क

III. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाला **तीन** गुण आहेत. प्रत्येक प्रश्नांचे उत्तर **अर्ध्या** पानापेक्षा जास्त असू नये : $5 \times 3 = 15$

18. व्यवस्थापन आणि प्रशासन यामधील कोणतेही तीन फरक स्पष्ट करा.

19. 1993 नंतर जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेची ( DIET ) चालू केलेली कार्ये कोणती ?

20. 'शालेय वाचनालयात ज्ञानाचा खजिना असतो' या विधानाचे समर्थन करा.

21. शैक्षणिक योजनेमधील शिक्षकाची भूमिका कोणती आहे ?

22. आर्थिक मदतीचे शाळेचे वेगवेगळे स्रोत कोणते ?

23. तपासणीहून देखभाल ( निरीक्षण ) वेगळे कसे आहे ?

24. आधुनिक शिस्तीच्या संकल्पनेचा अर्थ लिहा.

**भाग - ड**

IV. खालील प्रत्येक प्रश्नांची उत्तरे **एक** किंवा **दोन** वाक्यात लिहा. प्रत्येक प्रश्नाला **एक** गुण आहे.

10 × 1 = 10

25. 'जर सक्षम व्यवस्थापन नसेल तर सर्व योजना, धोरणे आणि अस्तित्वातील सराव क्रिया बंद पडतात ( बारगळतात ) ? हे कोणी म्हटले आहे ?

26. 'मालक' आणि 'नेता' या पदांचा अर्थ लिहा.

27. DSERT ची स्थापना कोणत्या वर्षी झाली ?

28. 1976 च्या घटनेच्या कोणत्या यादीत शिक्षणाचा समावेश केलेला आहे ?

29. शाळेचे अतिशय महत्वाचे आणि मुलभूत उद्दिष्ट कोणते ?

30. शाळेच्या वेगवेगळया कार्यासाठी कोणत्या मोठ्या खोलीचा ( हॉल ) वापर करतात ?

31. शालेय इमारत बांधताना कोणत्या रचनेचा वापर करतात ते सांगा.

32. सरकारी नोकर किती प्रासंगिक रजा ( casual leave ) घेऊ शकतात ?

33. शाळा आणि शिक्षण खाते यांची सांगड कोणी घातली ?

34. वेळापत्रक म्हणजे काय ?